## कुरखेडा - ब्रम्हपुरी बसफेरी बंद, विद्यार्थ्यांना फटका



**दै.युवाराष्ट्र दर्शन**
**तालुका प्रतिनिधी**
**कुरखेडा दि.३० :** ऐन परीक्षेच्या कालावधीमध्ये ब्रम्हपुरी आगाराने कुरखेडा वडसा- ब्रम्हपुरी बस बंद केल्याने त्याचा फटका विद्यार्थी व प्रवाशांना बसला असून विद्यार्थी या बसेसची ताटकळत वाट पाहताना दिसून येत आहेत.

सकाळी कुरखेडा वरून ९:३० वाजता व ११:३० वाजता येणारी ब्रह्मपुरी कुरखेडा बस ही त्याच वेळेवर सुरू करण्यात यावी. विद्यार्थ्यांची व प्रवाशांची होणारी पिळवणूक थांबवण्यात यावी अशी मागणी प्रवाशी व विद्यार्थ्यांनी केली आहे.

ब्रम्हपुरी आगाराने आज पासून बंद केलेली बस तात्काळ सुरू करण्यात करवी अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा विद्यार्थी व प्रवाशांनी ब्रम्हपुरीच्या आगार व्यवस्थापकांना दिला आहे.

## बस स्थानकाचे काम कासव गतीने सुरू



**दै.युवाराष्ट्र दर्शन**
**विशेष प्रतिनिधी**
**देसाईगंज दि.३० :** जिल्ह्यात एकमेव व्यापारी केंद्र असलेले तसेच एकमेव रेल्वे स्टेशन असेलेले शहर म्हणून ओळख असलेले शहर देसाईगंज शहर, आरमोरी विधानसभा मतदारसंघातील मोठे शहर. असताना, येथे सुरु असलेले बस स्थानकाचे काम कासव गतीने सुरु असून शहरातील देसाईगंज शहरातील मुख्य रस्त्यावर वाहतुकीचा प्रश्न निर्माण झाला आहे. सुरजागड वरून येणारे मोठे मोठे ट्रक या मार्गावरून जात असल्यामुळे देसाईगंज शहारातील अपघाताचे प्रमाण वाढले आहे व भविष्यात सुद्धा अपघात होण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

देसाईगंज येथे बसस्थानक रस्त्यावर असल्यामुळे आणि रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी बसेस उभ्या राहत असल्यामुळे प्रवाश्यांना जाण्याकरिता मार्ग उपलब्ध नाही शाळेतून आपल्या गावाला बसणे जाण्यासाठी शाळा सुटल्यानंतर बस पकडण्यासाठी अगदी धावत सुटतात. त्यामुळे

### देसाईगंजवासी बसस्थानकाच्या प्रतिक्षेतच

एखाद्या दिवशी जीवित हानी होऊ शकते. त्यामुळे स्थानिक लोक प्रतिनिधी व प्रशासनाने याकडे लक्ष देऊन बस स्थानकाच्या कामाची गती वाढविण्याच्या सूचना संबंधित कंत्राटदाराला द्याव्या अशी मागणी देसाईगंज शहरातील जनतेनी केली आहे.

मागील पांच वर्षापासून बस स्थानकाचे काम सुरु आहे. मात्र कामाला गती नाही. सोबतच सरकारने विविध योजना बस प्रवासिनी देण्यात येत आहेत मात्र देसाईगंज शहरातून एकही बस नागपूरसाठी नाही तर या योजनेचा काय फायदा असा प्रश्न जनता विचारीत आहे.

चंद्रपूर, नागपूर, गोंदिया या मोठ्या शहरांच्या मध्यभाग असलेले हे शहर असल्यामुळे मोठी वाहतूक या शहरातून होते. अनेकदा सदर बाब लोकप्रतिनिधी आणि अधिकारी वर्ग यांना सुद्धा सांगितली आहे मात्र अजूनही यावर तोडगा निगालेला नाही. तेव्हा सदर बस स्थानका चे काम लवकर करून लोकांना चांगली बस सेवा उपलब्ध करून द्यावी अशी मागणी देसाईगंज तालुक्यातील जनतेनी केली आहे.

## राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेत लॉयड्स व्हॉलीबॉल संघ उपविजेता



**दै.युवाराष्ट्र दर्शन**
**तालुका प्रतिनिधी**
**अहेरी दि.३० :** गडचिरोली जिल्ह्यातील अहेरी येथे २२ ते २६ जानेवारी २०२६ या कालावधीत आयोजित राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेत लॉयड्स व्हॉलीबॉल संघाने उल्लेखनीय कामगिरी करत उपविजेतेपद पटकावले. महाराष्ट्राच्या विविध भागांतील संघांविरुद्ध झालेल्या चुरशीच्या सामन्यांनंतर लॉयड्स संघाने ही कामगिरी साध्य केली.

पाच दिवस चाललेल्या या स्पर्धेत राज्यातील विविध भागांतील एकूण १६ संघांनी सहभाग घेतला होता, ज्यामुळे स्पर्धेचा दर्जा आणि क्रीडाभावना अधोरेखित झाली. अंतिम सामन्यात नागपूर ऑरेंज सिटी संघाने उत्कृष्ट खेळ करत विजेतेपद मिळवले.

संपूर्ण स्पर्धेत सातत्य, शिस्त आणि उत्कृष्ट सांघिक समन्वय दाखवत लॉयड्स व्हॉलीबॉल संघ अंतिम फेरीत पोहोचला आणि उपविजेता ठरला. या यशाबद्दल संघाला रूपये ५५,००० रुपयांचे रोख पारितोषिक देण्यात आले.

लॉयड्स व्हॉलीबॉल संघाचे हे यश लॉयड्स स्पोर्ट्स अकादमीच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे फलित आहे. ही अकादमी लॉयड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक श्री बी. प्रभाकरन यांच्या संकल्पनेतून साकार झाली आहे. श्री प्रभाकरन यांनी लॉयड्स संघाचे अभिनंदन करत विविध क्रीडा स्पर्धांमध्ये सातत्याने सहभाग घेण्याचे आवाहन केले आहे.

## महिला महाविद्यालयात 'अरण्य धून' वार्षिक महोत्सवाचे आयोजन



**दै.युवाराष्ट्र दर्शन**
**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि.३० :** गडचिरोली जिल्ह्याला खूप समृद्ध संस्कृती आहे आणि या संस्कृतीचे खरे प्रतिबिंब 'अरण्य धून' वार्षिक महोत्सवात दिसून येते, असे प्रतिपादन गडचिरोलीचे आमदार डॉ.मिलिंद नरोटे यांनी श्री साईबाबा ग्रामीण विकास संस्थेद्वारे संचालित महिला महाविद्यालय आणि फुले-आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'अरण्यधून-२०२६' या क्रीडा आणि सांस्कृतिक वार्षिक महोत्सवात बोलताना सांगितले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्राचार्य डॉ.योगेश पाटील यांनी केले तर गोंडवाना विद्यापीठाचे प्रो-कुलगुरू डॉ.श्रीराम कावळे हे विशेष पाहुणे होते. फुले-आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्कचे प्राचार्य डॉ.रूपेंद्रकुमार गौर, महिला महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाच्या प्रमुख डॉ.कुंदन दुफारे आणि डॉ.फुले-आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्कच्या सांस्कृतिक विभागाच्या प्रमुख वर्षा तिडके या प्रमुख उपस्थित होत्या.

कार्यक्रमादरम्यान, दोन्ही महाविद्यालयांमधील विविध गुणवंत विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. प्रा. यादव गहाणे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले, तर प्रा. ज्ञानेश्वर धकाते यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महिला महाविद्यालय आणि फुले-आंबेडकर सामाजिक कार्य महाविद्यालयातील सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी स्वयंसेवकांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमानंतर मान्यवरांनी सांस्कृतिक कार्यक्रमांचा आनंद घेतला. यावेळी परिसरातील विद्यार्थी, पालक आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दक्षता बांबोळे राज्यस्तरीय निबंध स्पर्धेत प्रथम



**दै.युवाराष्ट्र दर्शन**
**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि.३० :** डॉ.बाबासाहेब आंबेडकर समता प्रतिष्ठान, नागपूर (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन) यांच्या वतीने संविधान दिनाचे औचित्य साधून २६ नोव्हेंबर २०२५ रोजी राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. संविधान मूल्ये, सामाजिक समता व न्याय या विषयांवर आधारित या स्पर्धेत राज्यभरातून अनेक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेचा निकाल २६ जानेवारीला जाहीर झाला असून कु.दक्षता बांबोळे यांनी आपल्या उत्कृष्ट लेखनशैली, सखोल अभ्यास आणि प्रभावी मांडणीच्या जोरावर प्रथम क्रमांक मिळवला.

तिच्या या उल्लेखनीय यशाबद्दल डॉ.बाबासाहेब आंबेडकर समता प्रतिष्ठानचे व्यवस्थापकीय संचालक सुरेंद्र पवार यांच्या स्वाक्षरीचे प्रशस्तीपत्र तसेच धनादेश कु.दक्षता बांबोळे यांना सहायक आयुक्त समाज कल्याण, गडचिरोली, डॉ.सचिन मडावी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

या यशाबद्दल गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.प्रशांत बोकारे, प्र-कुलगुरू डॉ.श्रीराम कावळे, कुलसचिव डॉ.अनिल हिरेखण, संगणकशास्त्र विभागाचे प्रमुख तसेच सर्व प्राध्यापक व कर्मचारी वर्ग यांनी कु.दक्षता बांबोळे यांचे अभिनंदन करत तिच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## उमरी शेतशिवारात आढळलेल्या मृतदेहाची ओळख पटली



**दै.युवाराष्ट्र दर्शन**
**तालुका प्रतिनिधी**
**चामोर्शी दि.३० :** आष्टी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील उमरी शेतशिवारात आढळलेल्या अनोळखी पुरुषाच्या मृतदेहाची ओळख पटली असून, मृतकाचे नाव अप्पाराव केरबा कांबळे (रा. उमरी) असे निष्पन्न झाले आहे. या प्रकरणी आष्टी पोलीस ठाण्यात मर्ग क्रमांक ०५/२०२६ अन्वये कलम १९४ बी.एन.एस.एस. अंतर्गत नोंद करण्यात आली असून, मृत्यूचे कारण अद्याप अज्ञात आहे. २९ जानेवारीला दुपारी १ वाजण्यापूर्वी, उमरी गावाच्या सुमारे ७ किलोमीटर उत्तरेस असलेल्या शेतशिवारात ही घटना उघडकीस आली. उमरी येथील चंद्रशेखर निलकंठ रोहनकर (३०) यांच्या धानाच्या शेतातील तनिसामध्ये एक पुरुष जातीचा मृतदेह पडून असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलीस पाटील इंद्रदास चक्कावार यांना याबाबत कळविण्यात आले. त्यांच्या तोंडी फिर्यादीवरून आष्टी पोलीस ठाण्यात मर्ग दाखल करून चौकशी सुरू करण्यात आली.

## आजपासुन खंजीरी भजन स्पर्धा व किर्तन महोत्सव



**दै.युवाराष्ट्र दर्शन**
**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि.३० :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची खंजरी भजन परंपरा पुढे चालू राहावी, या उद्देशाने गडचिरोली येथे ३१ जानेवारी व १ फेब्रुवारी या दोन दिवसीय विदर्भस्तरीय राष्ट्रसंत खंजरी भजन स्पर्धा व किर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

या महोत्सवांतर्गत दि.३१ जानेवारी व १ फेब्रुवारी २०२६ रोजी विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दि.१ फेब्रुवारी रोजी सकाळी ५.३० वाजता सामुदायिक ध्यान, दोन्ही दिवशी सायंकाळी ६ वाजता सामुदायिक प्रार्थना तसेच दि.१ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ४.५८ वाजता मौन श्रद्धांजली अर्पण करण्यात येणार आहे. यावेळी डॉ. उमेश समर्थ, अश्विनी गायकवाड व वैष्णवी बावणे हे आपले विचार मांडणार असून संचालन प्रविण एल. मुक्तावरम करणार आहेत.

या महोत्सवाचा उद्घाटन समारंभ शनिवार, दि.३१ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता चामोर्शी मार्गावरील कात्रटवार कॉम्लेक्समधील कमल - केशव सभागृहात पार पडणार आहे.

उद्घाटक नगर परीषदेचे माजी सभापती प्रा.राजेश कात्रटवार उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्षा ॲड.प्रणोती निंबोरकर राहणार असून सहउद्घाटक म्हणून शितल सोमनानी उपस्थित राहणार आहेत. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

महोत्सवात सायंकाळी ७ वाजता विदर्भाची लाडकी किर्तनकार शुभांगी डाहुले व संच (नागपूर) यांचे किर्तन होणार आहे. तसेच पुरुष, महिला व बाल गटासाठी विदर्भस्तरीय खंजरी भजन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून विजेत्यांना रोख बक्षिसे व आकर्षक भेटवस्तू देण्यात येणार आहेत. बक्षीस वितरण समारंभ रविवार, दि.१ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री १० वाजता पार पडणार आहे.

## कमलापुरात हत्ती वैद्यकीय रजेवर



**दै.युवाराष्ट्र दर्शन**
**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि.३० :** राज्यातील एकमेव हत्ती कॅम्प म्हणून प्रसिद्ध असलेल्या कमलापूर येथील हत्तींचे पर्यटकांना नेहमीच आकर्षण असते. त्यांना पाहण्यासाठी सहकुटुंब अनेक पर्यटक लांबून येतात. मात्र या हत्तींच्या पायांना भेगा पडू नये यासाठी केल्या जाणाऱ्या वैद्यकीय उपचारांमुळे हे हत्ती ३० जानेवारीपासून १२ फेबुवारीपर्यंत पर्यटकांना भेटण्यासाठी उपलब्ध राहणार नाही.

कमलापूर कॅम्पमध्ये सध्या ९ हत्ती आहेत. वातावरणातील बदलामुळे हत्तींच्या पायांना भेगा पडणे, जखमा होणे आणि त्यामुळे चालण्यास अडथळे निर्माण होण्याची शक्यता असते. त्यामुळे दक्षता म्हणून पुढील १३ दिवस सर्व हत्तींच्या पायांना आयुर्वेदिक औषध लावून 'चोपिंग' केले जाणार आहे. त्यात आयुर्वेदिक औषधीयुक्त वनस्पती आणि तेल याचा लेप लावला जातो. १२ फेब्रुवारीपर्यंत पर्यटकांनी कॅम्पला भेट देऊ नये, असे आवाहन वनविभागाच्या वतीने करण्यात आले आहे. वनपरिक्षेत्र अधिकारी जी.जी.गडमडे, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.एन. आर.चव्हाण, क्षेत्र सहायक एस.के. पेंदोर, वनपाल आर.एस.साबळे, वनरक्षक एच.एच.शहा यांची चमू हे उपचार करणार आहे.

## विद्यार्थ्यांनी केला गावातील समस्यांचा अभ्यास



**दै.युवाराष्ट्र दर्शन**
**विशेष प्रतिनिधी**
**देसाईगंज दि.३० :** अनिकेत समाजकार्य महाविद्यालयातील बी. एस.डब्ल्यु.च्या सहाव्या सत्राच्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक अभ्यासक्रमानुसार एकलपुर येथे क्षेत्रकार्य केले. या अंतर्गत त्यांनी गावातील समस्या जाणुन घेण्याचा प्रयत्न केला. या अंतर्गत लक्षात आले की, एकलपूर या गावात रोड, नाल्या तसेच परिवहणाची समस्या लक्षात आली.

यावेळी अर्पिता ढोके, तोष्णा बोरकर, रोशनी ताराम, सपना भागडकर, सरीता घोडमोडे, नाजुक भांडेकर, सुश्मिता वलके, छबीला लाडे उपस्थित होते.

या क्षेत्रकार्याचे पर्यवेक्षणाचे कार्य डॉ.प्रा.बाळबुध्दे यांनी केले.

## धानोरा येथे सर्व पक्षातर्फे अजित दादांना श्रध्दांजली



**दै.युवाराष्ट्र दर्शन**
**तालुका प्रतिनिधी**
**धानोरा दि.३० :** येथील मुख्य चौकात स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या निधनाची सर्व पक्षीय शोकसभा आयोजित करण्यात आलेली होती. यानिमित्ताने भाजप अध्यक्ष सजन गुंडावार, कॉंग्रेस नेते राजू मोहरले, मुबारक सय्यद, वरवडे, ममता हिचामी, चंदू किरंगे, सारंग सडवे, तूफान उंदीरवाडे, राकेश खरवडे, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अध्यक्ष सर्फराज शेख, नागापुरे, वटी, जिल्पे आणि रा.कॉंग्रेस पार्टीचे कार्यकर्ते उपस्थित होते.

शोकसभेचे सूत्र संचालन अभय इंदुरकर यांनी केले.

## एक फेब्रुवारीला नागपूरात सैनिक रॅलीचे आयोजन

**गडचिरोली :** रविवार १ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता नागपूर येथील रेशीम बागेजवळील सुरेश भट्ट सभागृहात स्टेशन हेडक्वॉर्टर कामठीतर्फे सैनिक रॅलीचे आयोजन केलेले आहे. रॅलीमध्ये माजी सैनिक, माजी सैनिक विधवा यांच्याकरीता रेकार्ड ऑफिसतर्फे तक्रार केंद्र, ईसीएचएस स्टॉल, मेडिकलस्टॉल, सीएसडी स्टॉल, व इतर स्टॅल लागणार आहेत. गडचिरोली जिल्ह्यातील माजी सैनिक, माजी सैनिक विधवा व अवलंबित यांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून संविधाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी तथा जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी सुधाकर पवार यांनी केले आहे.

## मोकाट श्वानांचा हैदोस

**आरमोरी :** तालुका मुख्यालयाचे ठिकाण असलेल्या आरमोरी शहरातील प्रत्येक वार्डात मोकाट श्वानांचा हैदोस वाढला आहे. या मोकाट श्वानांमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. शहरातील गल्लोगल्लीत श्वानांचे कळप दिसून येतात. यामुळे आवागमनासह अडथळा निर्माण होत आहे.

## तापमानात वाढ होण्यास प्रारंभ

**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि.३० :** गडचिरोली जानेवारी महिण्याच्या दुसऱ्या आठवड्यापासून तापमानात वाढ होण्यास प्रारंभ झाला आहे. यामुळे आता रात्रीची वेळ वगळता दिवसभर पंखे सुरू ठेवावे लागत आहेत. फेब्रुवारी मध्यंतरानंतर याच्यापेक्षा तापमानात वाढत होतांना दिसते.

## १ फेब्रुवारी रोजी कुनघाडा रै येथे भव्य हिंदू संमेलन

**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि.३० :** सकल हिंदू समाज मंडळ कुनघाडा रै यांच्या वतीने हिंदू जागृतीला नवी दिशा देण्यासाठी, सनातन संस्कृती, सनातन धर्म व सामाजिक एकतेच्या दृढतेसाठी १ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी १२ वाजता माता मंदिर बाजारपेठ कुनघाडा रै येथे भव्य हिंदू संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. संमेलनाला आशिर्वाचन म्हणून हरणघाट येथील प.पू.संत मुरलीधर महाराज, विशेष मार्गदर्शक म्हणून हभप धनराज महाराज मुरखडा, हभप वनिता दुपारे कोंढाळा व प्रमुख वक्ते म्हणून अनंतराव बुजोने उपस्थित राहणार आहेत. संमेलनाला उपस्थित राहून समाजात नवी ऊर्जा व चेतना निर्माण करावी असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## जिल्हाधिकाऱ्यांकडुन जिल्हा खुल्या कारागृहाची पाहणी



**दै.युवाराष्ट्र दर्शन**
**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि.३० :** जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा यांनी आज गडचिरोली जिल्हा खुले कारागृहाला भेट देऊन कारागृहातील विविध व्यवस्थांची सविस्तर पाहणी केली. यावेळी त्यांनी कैद्यांशी थेट संवाद साधत त्यांच्या कौशल्य विकासासाठी शेतीव्यतिरिक्त विविध प्रशिक्षण उपलब्ध करून देण्यावर विशेष भर देण्याच्या सूचना दिल्या.

जिल्हाधिकाऱ्यांनी कैद्यांशी संवाद साधत आतापर्यंत कोणती नवी कौशल्ये आत्मसात केली आहेत, कोणते प्रशिक्षण घ्यावेसे वाटते, तसेच विणकाम, वाडीकाम, शेतीपूरक उद्योगांसह इतर कोणती कामे करता येऊ शकतात याबाबत सविस्तर विचारपूस केली. कैद्यांना आत्मनिर्भर बनविण्यासाठी कौशल्य विकासाचे नियोजनबद्ध प्रशिक्षण देणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कारागृहातील स्वयंपाकगृहाची पाहणी करताना कैद्यांना जेवण व नाश्त्यामध्ये दिल्या जाणाऱ्या आहाराबाबत माहिती घेतली. तसेच कारागृहातील औषधसाठा, वैद्यकीय सुविधा, आपत्कालीन परिस्थितीत करण्यात येणारी कार्यवाही याबाबत वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून त्यांनी सविस्तर माहिती जाणून घेतली.

याशिवाय सुरक्षा व्यवस्था, स्वच्छतागृहांची स्वच्छता, पावसाळ्यात पाण्याची गळती होते का, कारागृहातील ग्रंथालय व त्याचा वापर, दीर्घकालीन शिक्षा भोगणाऱ्या कैद्यांची स्थिती, त्यांना मिळणारी सुट्टी व कुटुंबीयांशी भेटीची व्यवस्था या बाबतही जिल्हाधिकाऱ्यांनी सखोल चौकशी केली. जिल्हा विकास निधीतून कारागृहासाठी मंजूर करण्यात आलेल्या विविध कामांचा आढावा त्यांनी यावेळी घेतला.

कारागृह अधीक्षक सुभाष सोनवणे यांनी कारागृहातील सुविधा, सुरू असलेली कामे व भावी नियोजनाबाबत जिल्हाधिकाऱ्यांना माहिती सादर केली.

यावेळी दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) एस. पी. सदाफळे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता सुरेश साखरवडे, कारागृह पोलीस निरीक्षक वैभव आत्राम, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. मनिष मेश्राम, उद्योग निरीक्षक पूनम कुसराम यांच्यासह इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते.

## मोहसीनभाई जव्हेरी महाविद्यालयात हुतात्मा दिनी अभिवादन



**दै.युवाराष्ट्र दर्शन**
**तालुका प्रतिनिधी**
**देसाईगंज दि.३० :** दि.३० जानेवारीला सकाळी ११.०० वाजता हुतात्मा दिनानिमित्त मोहीनभाई जव्हेरी महाविद्यालय, वडसा येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी तसेच देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण करणाऱ्या सर्व स्वातंत्र्यसैनिक व हुतात्म्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नाजीम शेख यांच्या नेतृत्वाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाच्या परिसरात सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी दोन मिनिटे मौन पाळून राष्ट्रपिता महात्मा गांधी तसेच स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या वीर हुतात्म्यांच्या त्यागाला आदरांजली वाहिली.

याप्रसंगी प्रा.सत्यनारायण पुसाला, डॉ.सुनील चौधरी, डॉ. दीप्ती इंगोले, डॉ.रामकृष्णन येराजवार, डॉ.सुचिता पेद्दीवार, प्रा. सचिन लोणारे, प्रा.प्रवीण पत्रे यांच्यासह नंदकिशोर अटाळकर, कु.वैशाली ब्राम्हणे, नितीन पाथोडे, रवी जीवतोडे, संजय बुरडे, महेंद्र घोडेस्वार, नंदकिशोर चहांदे उपस्थित होते.

